जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 JUN 2025
पुढारी

# विद्यापीठाकडून ६५ 'स्टार्ट-अप'ना प्रोत्साहन

## 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज'चा लाभ घेण्याचे आवाहन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या 'एसयुके रिसर्च अँड फाऊंडेशन' या इनक्युबेशन सेंटरमध्ये शेती, संगणक, रसायन, आरोग्य, पर्यावरण, अन्नप्रक्रिया इत्यादींमधील ६५ स्टार्टअप उद्योगांना बळ देण्यात आले आहे.

या माध्यमातून नवउद्योगांना- विविध वित्त संस्थांकडून बीज भांडवलही देण्यात आले आहे. स्टार्ट-अप सुरू करू इच्छिणाऱ्यांसाठी आता मासिक इनोव्हेशन चॅलेंजद्वारे ही संधी चालून आली आहे, अशी माहिती संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी दिली.



डॉ. डेळेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरमध्ये विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना समाजातील विविध समस्यांवर नावीन्यपूर्ण उत्तरे व समाधान सुचविण्याची संधी 'मंथली इनोव्हेशन चॅलेंज' या उपक्रमातून देण्यात आली. नावीन्यपूर्ण संकल्पना व त्यावरील उद्योग याबाबत केंद्रातून नवयुवकांना उद्योजकतेच्या संधीही उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या निवड झालेल्या स्टार्टअप्सना महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, स्टार्टअप इंडिया, केंद्र सरकार, एमएसएमई, सारथी यांसह इतर शासकीय व खाजगी संस्थांकडून बीजभांडवल मिळण्याची संधी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व नागरिक यांनी आपल्या कल्पना १५ जून २०२५ पर्यंत विद्यापीठाच्या वेबसाईटवर न्यूज अँड इव्हेंटस् या विभागात जाऊन गुगल फॉर्ममध्ये भराव्यात व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले आहे.